# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक ०९/११/२०१५**

**सायं ४.०० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१०/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१०/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २ | **प्रश्नोत्तरे** | १ \| ९/११/२०१५ \| श्री. धनंजय विठ्ठल गावडे \| गाव मौजे मोरे आरक्षण क्रमांक ३२८, ३३१ येथील आरक्षणाचे स्वरूप, एकुण क्षेत्र, इमारत बांधकाम परवानगी तसेच रेल्वे व सार्व. बांधकाम विभागाने N.O.C. दिल्याबाबत प्रती \| मा. उपसंचालक, नगररचना<br>अनुमोदक - कल्पेश मानकर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ३ | **शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव** | १ मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, (शासन परिपत्रक)<br>२ मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, (शासन निर्णय)<br>३ मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, (शासन परिपत्रक)<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ४ | **श्री. ऋषिकेश विजय परब यांना लाड कमिटी शिफारशीनुसार सफाई कामगार या पदावर सामावुन घेणेबाबत.** | निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई येथील मयत कर्मचारी कै.श्री. विजय आत्माराम परब यांचे सेवेत असताना निधन झाले त्यांचा वारस मुलगा श्री. ऋषिकेश विजय परब असुन यांनी लाड कमिटीच्या शिफारसीनुसार सफाई कामगार पदावर नियुक्ती मिळणेबाबत मुदतीत अर्ज सादर केला आहे. सबब, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. लासशि/२००६/५९/प्रक्र ७७/नवि-६ दिनांक ११ ऑगस्ट, २००६ |

| | | |
|---|---|---|
| | | नुसार श्री. ऋषिकेश विजय परब यांना लाड कमिटी शिफारसीनुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेत सफाई कामगार पदावर नियुक्ती देणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - विद्या पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ५ | **नालासोपारा पूर्व संतोष भुवन स्टेशन रोड पेट्रोलपंपासमोरील जागेत 'पे अण्ड युज' (BOT) तत्वावर नविन शौचालयाचे बांधकाम करणे.** | **<u>प्रस्तावाचा निर्णय :-</u>** सदर जागेत पे ॲण्ड यूज' (BOT) तत्वावर शौचालय उभारण्याकरिता मे.केतन वेल्फेअर असोसिएशन यांना ३ वर्षे करारावर परवानगी देणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर मुदत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने ९ वर्षाकरिता वाढवून देणेत यावी असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक - सिताराम गुप्ता सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ६ | **वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दित 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत सामुहिक शौचालय बांधणेसाठी (१ सीट शौचालय ते ७ सीट शौचालय) अंदाजपत्रकास प्रशासकीय / वित्तीय मान्यता देणे व ठेकेदाराचे पॅनल नियुक्त करणे.** | **<u>प्रस्तावाचा निर्णय :-</u>** वसई विरार शहर महानगरपालिका 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत सामुहिक शौचालय बांधवयाची असून शासनाकडून प्रति शौचालय रु.३२,५००/- अनुदान मंजूर होणार असून २७२ शौचालयास र.रु.३२,५००/- प्रमाणे र.रुपये.८८,४०,०००/- होणाऱ्या खचार्स ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत येते आहे. तसेच निविदा मागवून ठेकेदारांचे पॅनल नियुक्त करणेत यावे तसेच कोणीही नोंदणीकृत ठेकेदार सदर पॅनेलमध्ये काम करणेस इच्छुक असल्यास त्यासही सदर पॅनेलवर समाविष्ट करुन घेण्यात यावे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखड्यातील मौजे-बोळींज स.नं. ४११ पैकी खाजगी जागा व मौजे - विरार, स.नं.- ३७६ पैकी शासकीय जागेमध्ये शासकीय कार्यालयांसाठी आरक्षित असलेल्या (आरक्षण क्र. १३७) जागेलगत दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या (आरक्षण क्र. १३७ अ) ह्या शासकीय जागेवर शासकीय कार्यालयांसाठी जागा आरक्षित करणे व त्या एकत्रित क्षेत्र ४९८२४ चौ.मी. जागेसाठी आरक्षण क्र. १३७ देऊन त्यासाठी अंमलबजावणी व भूसंपादन करणारे समुचित प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिका करणे तसेच मौजे बोळींज स.नं. ३९२ पैकी म्हाडा ह्या | **<u>ठराव/निर्णय :-</u>** वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये (सोबत जोडलेल्या नकाशा क्र.MOD. No.०१, २०१४-१५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) खालील काही नविन बाबींचा अंतर्भाव करणे व सध्या असलेल्या आखणीमध्ये बदल करणेस व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांस हि सभा मान्यता देत आहे व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे. याकामी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी.<br>१. वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयातील मौजे-बोळींज स.नं-४११ पैकी खाजगी जागा व मौजे-विरार, स.नं-३७६ पैकी शासकीय जागेमध्ये शासकीय कार्यालयांसाठी आरक्षित असलेल्या (आरक्षण क्र.१३७ क्षेत्रफळ-२५०८५ चौ.मी.) जागेलगत दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या (आरक्षण क्र.१३७ अ क्षेत्रफळ-२४७३९ चौ.मी.) हया शासकीय जागेवर शासकीय |

| | | |
|---|---|---|
| | शासकीय संस्थेच्या ले-आऊट मधील तसेच शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या बगीचा व १२ मी. रुंदीचा D.P. रस्ता या आरक्षणाखालील जागा व ई.पी. १८ नुसार प्रलंबित असलेल्या बस आगार व बस अंतिम स्थानक (BD & BT) मधील काही जागेवर दफनभूमीचे आरक्षण प्रस्तावित करणे. सदर आरक्षणास आरक्षण क्र. १४५ देणे व त्यासाठी अंमलबजावणी व भूसंपादन करणारे समुचित प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेकामी अंतिम मंजुरी मिळणेबाबत. | कार्यालयांसाठी जागा आरक्षित करणे व त्या एकत्रित क्षेत्र -४९८२४ चौ.मी जागेसाठी आरक्षण क्र.१३७ देणे व याकामी अंमलबजावणी व भूसंपादन करणारे समुचित प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका करणे.<br>२. मौजे-बोळींज स.नं-३९२ पैकी शासनाने महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या तसेच म्हाडा हया शासकीय संस्थेच्या ले-आऊट मधिल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या बगिचा व १२ मी. रुंदीचा D.P रस्ता या आरक्षणाखालील जागा क्षेत्र-१८४२१ चौ.मी. व ई.पी-१८ नुसार मंजूर झालेल्या रहीवास क्षेत्रा मधिल काही जागेवर क्षेत्रफळ ६३२७ चौ.मी. जागा हरित पट्टा/दफनभूमीचे प्रार्थनास्थळ आरक्षण प्रस्तावित करणे. सदर आरक्षणास आरक्षण क्र.१४५ देणे व याकामी अंमलबजावणी व भूसंपादन करणारे समुचित प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका करणे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | **विरार (पू.) पापडखिंड धरणालगतचा स्विमिंग पुल व्यवस्थापन करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका विरार (पू.) येथील पापडखिंड धरणालगतच्या जलतरण तलाव तीन वर्षाकरीता व्यवस्थापन करणेकरीता चालविण्यास देणेसाठी व सदर व्यवस्थापनामध्ये व्यवसायिक प्रशिक्षकाची नियुक्ती करणेकरीता होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ९ | **सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षानुसार तीन वर्षासाठी महानगरपालिकेचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** सदर प्रस्तावाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेनुसार सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षासाठी ही निविदा प्रक्रीया करून स्पर्धात्मक निविदा मागविणेस ही सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - रूपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १० | **वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या डेब्रीज विल्हेवाट लावण्यासाठी सी अॅड डी (सिमेंट कॉक्रीट अॅड डेब्रीज) प्रकल्प राबविणेबाबत.** | **<u>ठराव / निर्णय :</u>** वरिल प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमधील निर्माण होणा-या निकामी बिल्डींग साहीत्य (water material) दगड, विटा, रॅबीट वगैरेसाठी डेब्रिजचे पुर्नचक्रिकरण करण्यासाठी सामाईक प्रक्रीया केंद्र उभारणे कामी महानगरपालिका हद्दीतील उपलब्ध मिठागराच्या जमिनी (Salt Department) त्यांची परवानगी घेऊन किंवा राज्य शासनाच्या जमिनीवर सी ॲण्ड डी प्रकल्प केंद्र उभारण्यासाठी निविदा मागवून अभिकर्ता नेमून जागा भाडे तत्वाने देणे किंवा महानगरपालिकेच्या जागेवर टाकणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे कामी होणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरिवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ११ | **वसई-विरार शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.फेज-२ (एन आर एच एम) योजनेअंतर्गत ८६ पदे निर्माण करणे व सद्याच्या कार्यरत २९ पदांना महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरूपी समावून घेणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावातील लेखापाल (Accountant) पदांच्या वेतनश्रेणीबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेतील केंद्रशासन पुरस्कृत प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच. फेज - २ योजनेवरील लेखापाल (Accountant) या पदाच्या रु. ५२००-२०२००, ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीऐवजी अनुज्ञेय असलेली रु. ९३००-३४८००, ग्रेड पे ४३०० ही वेतनश्रेणी दि. ११/०२/२०१५ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास कळविण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रशांत राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १२ | **वसई तालुक्यामधील जनतेच्या सुरक्षितेसाठी पोलीस विभागास जीप व मोटरसायकल वाहने खरेदी करुन देणेबाबत विचार विनिमय करणे.** | **ठराव / निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन केले असता वसई तालुक्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागास ७ पोलीस स्टेशनसाठी प्रत्येकी १ प्रमाणे ७ बोलेरो वाहने शासकिय दरकरारानुसार महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि. कंपनीकडुन खरेदी करण्यास व ई-निविदा प्रक्रिया करुन १४ मोटारसायकल वाहने खरेदी करणे व इतर अनुषंगिक खर्चासाठी होणाऱ्या रक्कम रु. ५९,५०,०००/- पर्यंतच्या खर्चास हि सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १३ | **वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यांवरील रहदारी / वाहतुक नियंत्रणासाठी आवश्यक ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविणेबाबत विचार करणे.** | **निर्णय :-** वसई विरार शहर महनगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील रहदारी / वाहतुक नियंत्रणासाठी सिग्नल यंत्रणा बसविणे बाबत महानगरपालिकेचा एकात्मीक शहर वाहतुक आराखडा लक्षात घेवुन सिग्नल यंत्रणेविषयी तज्ञ सल्लागाराच्या मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली सिग्नल यंत्रणेची ठिकाणे निश्चित करुन सिग्नल यंत्रणा बसविणे व कार्यान्वित करणे कामी येणाऱ्या प्रस्तावनेत नमुद खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक - कन्हैया भोईर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १४ | **स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेअंतर्गत अतिरिक्त तरतुद उपलब्ध करणेबाबत.** | निर्णय :- स्थायी समिती सभा ठराव क्र. १५३ दिनांक ०६/११/२०१५ अन्वये स्थायी समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे अतिरीक्त अनुदानातून अतिरीक्त अर्थसंकल्पीय तरतुद प्रस्तावित करणेकामी याद्वारे मान्यता देणेत येत आहे.<br>अनुमोदक - महेश पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |

| | | |
|---|---|---|
| १५ | **सन २०१५-१६ च्या विविध लेखा शिर्षातर्गत अर्थसंकल्पिय पुन:विनियोजनास मान्यता देणेबाबत.** | निर्णय :- स्थायी समिती सभा ठराव क्र. १५४ दिनांक ०६/११/२०१५ अन्वये स्थायी समितीच्या शिफारशीनुसार आवश्यक ते फेरफार करुन विवरणपत्रानुसार अर्थसंकल्पीय पुन:विनियोजनास मान्यता देणेत येत आहे.<br>अनुमोदक - निलेश देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | **२६ व्या वसई तालुका क्रिडा महोत्सव २०१५ साठी अनुदान देणेबाबत निर्णय घेणे.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई तालुका कला क्रिडा महोत्सवाचे माध्यमातुन वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील स्पर्धकांच्या कला क्रिडा गुणांना वाव दिला जात असल्याने माहे डिसेंबर २०१५ मध्ये होणाऱ्या २६ व्या वसई तालुका कला क्रिडा महोत्सव २०१५ चे यशस्वी आयोजन करणेकामी रुपये ५० लक्ष अनुदान देण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे. सदरचा खर्च क्रिडा विषयक राखीव तरतुदी अंतर्गत वसई कला क्रिडा महोत्सव व इतर क्रिडा संस्थांना व व्यायाम शाळांना अनुदान या लेखाशिर्षामधुन करण्यांत यावा.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |